# महाविद्यालयांतून व्यवसायाभिमुख शिक्षणाची गरज-डॉ. पठाण


मोहन मेस्त्री

कमला कॉलेजमध्ये पारितोषक वितरण करताना डॉ. एस. एन. पठाण. सोबत डॉ. क्रांतीकुमार पाटील, डॉ. रा. कृ. कणबरकर.

**कोल्हापूर / प्रतिनिधी ■** रोजगाराची समस्या गंभीर होत असताना महाविद्यालयांनी चाकोरीबद्ध शिक्षण पद्धतीत अडकून राहू नये. स्वायत्त महाविद्यालये ही संकल्पना राबवत व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करावेत, असे आवाहन राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. एँस. एन. पठाण यांनी केले.

ताराराणी विद्यापीठाच्या कमला महाविद्यालयात झालेल्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. पठाण बोलत होते. अध्यक्षस्थानी ताराराणी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्राचार्य रा. कृ. कणबरकर होते.

डॉ. पठाण पुढे म्हणाले, सध्या रोजगाराची समस्या वाढत असताना उच्च शिक्षण विद्यापीठ अभ्यास मंडळाच्या चौकटीत अडकून चाकोरीबद्ध अभ्यासक्रम राबवणे योग्य नाही. शिक्षण क्षेत्रात स्वायत्त महाविद्यालय, विद्यापीठ ही संकल्पना रुजण्याची गरज आहे. केवळ पदव्या देऊन व घेऊन समाधान आता मानता येणार नाही. पदवीबरोबरच एखाद्या क्षेत्रातील कौशल्य संपादन करण्याची गरज आहे. यासाठी महाविद्यालयांनी छोटे-छोटे व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करावेत.

डॉ. पठाण पुढे म्हणाले, महिलांनी शिक्षण घेण्याच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. यापुढे उत्तम शिक्षण देण्याची जबाबदारी विद्यापीठांना पार पाडावी लागणार आहे. यातूनच महिलांचा विकास होणार आहे. पण अजूनही आपण चांगल्या वातावरणात महिलांना शिक्षण देण्यात कमी पडत आहोत याचे भान ठेवावे, अशी सूचनाही डॉ. पठाण यांनी केली.

स्पर्धेच्या युगात कौशल्यपूर्ण, व्यवसायाभिमुख शिक्षणातून नवी पिढी घडविण्याची जबाबदारी शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या सर्वच घटकांची आहे. पदव्या घेण्याबरोबर व्यक्तिमत्त्व विकास व कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम पूर्ण करण्याकडे विद्यार्थ्यांनी लक्ष केंद्रित करावे, असे आवाहन डॉ. पठाण यांनी केले.

डॉ. पठाण पुढे म्हणाले, ग्रामीण भागातील स्त्रियांना शिक्षण देण्याचे काकाजींचे स्वप्न ताराराणी विद्यापीठाच्या माध्यमातून पूर्णत्वास येत आहे. त्यामुळे ताराराणी विद्यापीठ हे दुसरे एस.एन.डी.टी. विद्यापीठ मानावे लागेल. यावर्षीची आदर्श विद्यार्थिनी महाविद्यालयाची विद्यार्थी प्रतिनिधी प्रियदर्शनी मोरे, विश्वासराव बागड व विद्यार्थिनींचा पठाण यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

डॉ. व्ही. एम. चव्हाण, डी. यू. पवार, डी. बी. पाटील, प्राचार्य सी. आर. गोडसे, गणपतराव भोसले, अनिल कदम आदी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या विविध उपक्रमांची व कार्याची माहिती दिली. कु. प्रियदर्शनी मोरे हिने स्वागत, प्रा. सौ. ए. व्ही. पाठक यांनी अहवालवाचन केले. प्रा. सौ. तेजस्विनी मुडेकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सौ. एन. एस. धुमाळ यांनी आभार मानले.

तरुण भारत. १०/२/०५